REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 9 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2019

# नैतिकमूल्य शिक्षण, आजच्या काळाची खरी गरज

प्रा. सुकेशिनी अंकुश जानराव
सोलापूर




प्रस्तावना :-

अलिकडे वर्तमानपत्र उघडताच मन विषण्ण करणाऱ्या बातम्या पाहावयास मिळतात, यामध्ये खून, मारामारी, भ्रष्टाचार, धार्मिक दंगे, आणि एकूणच मनुष्याची संवेदनशीलता नष्ट झाल्याच्या अनेक गोष्टी समोर येतात. आपण विज्ञानयुगाचे एकीकडे गुणगान करत आहोत पण त्याबरोबरीनेच माणसाच्या सहनशीलतेचे माणुसकीचे, संवेदनशीलतेचे, प्रेमाचे पतन होताना पाहात आहोत. माणसांमध्ये एवढी निष्ठुरता कशी आली याचा विचार करून मन सून्न होते.

आजचा समाज हा पूर्वीपेक्षा खूप मोठ्या प्रमाणात शिक्षित झाला आहे. मात्र या शिक्षित समाजामध्ये नैतिकतेचे पतन झालेले आहे.

आजचा मानव आध्यात्मिकतेचे ढोंग रचून नैतिक निष्ठांशी दिक्भ्रमित होऊन जीवनमूल्ये तुडविली जात आहे. नैतिक मूल्यांची अवहेलना करून वाईट मार्गाकडे वळत आहे. आणि नवीन पिढीच्या जैव विकासामध्ये अवरोध तत्व बनत चालले आहे. परंपरागत नैतिक मूल्य आचरणात न आणता त्याचा अवमान केला जातो. आणि यामुळेच समाजात, देशात अशांती, दूराचरण, चारित्र्यहनन, भ्रष्टाचार, काळाबाजार, धर्म लोलूपता, अर्थ लोलूपता, धनसंग्रह वाईट मार्गाने करणे या अनिष्ट प्रवृत्तींनी परमसीमा गाठलेली आहे. अशावेळी नवीन नैतिक मूल्यांची प्रतिष्ठापना व्हावयास पाहिजे किंवा नीतिशास्त्रात मूल्याला आपल्या जीवनामध्ये आणून जीवनाची या कलियुगातून मुक्तता व्हावयास पाहिजे.

शाळेमध्ये प्रारंभिक स्तरापासून विद्यार्थ्यांमध्ये नैतिकतेच्या अभावी असंतोष, भ्रष्टाचार, बेशिस्तीचे वर्तन, राष्ट्रीय संपत्तीची हानी करणे, चोरी करणे हे दुर्गूण दिसून येतात.

आणि म्हणून प्रथमपासून तर आतापर्यंत जेवढे विचारवंत होऊन गेले, जेवढे शिक्षण आयोग तयार झाले त्यांनी सर्वांनी शिक्षणामध्ये नैतिकता असण्यावर भर दिला. हरबर्ट यांनी असे म्हटले की, 'समग्ररूप में नैतिकशिक्षा शिक्षा से पृथक नही है ।'

स्वतंत्र भारतात शिक्षण आयोगानी सामाजिक नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांच्या शिक्षणासाठी संगठित प्रयत्न करण्यावर जोर दिलेला आहे. माध्यमिक शिक्षण आयोगानी म्हटले आहे की, चारित्र्याच्या विकासामध्ये धार्मिक आणि नैतिक शिक्षण महत्वपूर्ण योगदान देते.

डॉक्टर चेव यांनी म्हटल्याप्रमाणे 'बालकांच्या शिक्षणामध्ये नैतिकमूल्य शिक्षण यासाठी महत्वाचे आहे की ते बालकामध्ये उत्तम गुण आणि सवयीची निर्मिती करणे, जबाबदारीची भावना, सत्याचा शोध, उत्तम आदर्शांची प्राप्ती, जीवनदर्शनाची निर्मिती, आध्यात्मिक मूल्यांची अभिव्यक्ती करते.'

नैतिक शिक्षणाचे महत्व स्वीकार करताना विश्वविद्यालय आयोगात लिहिले आहे की,

''यदि हम अपनी शिक्षा संस्थाओं मे से आध्यात्मिक प्रशिक्षण को निकाल देंगे तो हम अपने संपूर्ण ऐतिहासिक विकास के विरुद्ध कार्य करेंगे ।''

राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी तर सदैव आपल्या जीवनात नैतिक शिक्षण व नैतिक मूल्यांच्या निर्मितीवर जोर दिला. ते

म्हणायचे की, माझ्यासाठी नैतिकता सदाचार आणि धर्म पर्यायवाची शब्द आहे. नेतिकेतेचे आधारभूत सिद्धांत सर्व धर्मामध्ये समान आहे. त्यामुळे बालकांना निश्चित रूपामध्ये शिकविले जात. शिक्षणामध्ये नैतिकमूल्य शिक्षण अतिशय महत्वाचे आहे. याशिवाय आपण खालील विचारांचा विचार करू की नैतिक शिक्षण का महत्वाचे आहे.

**१) शिक्षणाचा आत्मा नैतिकता :-** सर्व व्यक्ती, समाज, शैक्षणिक आयोगानी शिक्षणामध्ये नैतिकता असणे आवश्यक आहे असे सांगितले आहे. तरीही स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या ५० वर्षापर्यंतही यांचा विचार केला गेला नाही आणि आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतल्यासारखी झाली. परंतु आता तरी नैतिकता हाच शिक्षणाचा आत्मा आहे. हे लक्षात घेऊन यावर भर द्यावयास पहिजे. भारतीय शिक्षणाच्या डुबत्या प्रतिष्ठेला, वर्तमानकालीन संकट स्थितीला जर वाचवायचे असेल तर अभ्यासक्रमामध्ये नैतिक शिक्षणाला स्थान देणे, त्याचे कार्यान्वयन करणे अत्यंत महत्वाचे आहे आणि जर आताही याचा विचार केला गेला नाही तर, त्याच्या महत्वाला जाणले नाहीतर कुटुंब, समाजशाळा अन्य संपर्क स्थळे तसेच व्यक्तीमत्व, व्यायाम यांचा विकास होणार नाही. आणि समोर येणारी भावी पिढी सांस्कृतिक, राजनैतिक, आर्थिक व बेशिस्त वर्तनाने भोगून दुसऱ्या पिढीमध्ये योग्य ती मूल्ये स्थानांतरित करण्यासाठी सक्षम राहणार नाही. अन्यथा या महापुरुषांच्या पावन भारतभूमीचा ईश्वरच रक्षक आहे.

**२) आनंदप्राप्तीचे रहस्य :-** पाश्चात्य विचारकांच्या विचारानुसार नैतिक व्यक्ती संघर्ष करतो. सफलता प्राप्त करतो आणि पुन्हा संघर्षरत होतो. परंतु त्याला आनंदाची प्राप्ती होत नाही. धार्मिक व्यक्ती निश्चिम श्रद्धा ठेवतो. जीवनसंघर्षामध्ये जर धार्मिक व्यक्ती अयशस्वी झाली तरी त्याला आनंदप्राप्ती होते जेव्हा नैतिक व्यक्ती अयशस्वी झाल्या तर हिंमत सोडतात. म्हणजेच धार्मिक व्यक्ती अधिक आशावादी व संघर्षोन्मुखी असतात.

तर अधिकांश विचारवंत मानतात की, सामान्यता नैतिकता आणि धर्म या दोन बाबीत अंतर नाही. फक्त धर्म ईश्वरप्रेमावर भर देतो तर नैतिकता मानवप्रेमावर भर देते. मनुष्यच ईश्वराची सर्वश्रेष्ठ कृती आहे. शेवटी मानव प्रेमच कालांतराने ईश्वरप्रेमामध्ये रुपांतरित होते. सृष्टीरुपी नदीच्या दोन धारा आहेत. एक नैतिकता व दुसरा धर्म. जो सागरात मिळाल्यानंतर समान होते. वास्तविकतः जे लोक धार्मिक असतात ते नैतिक असतात व जे नैतिक असतात ते धार्मिक असतात आणि आनंदाची प्राप्ती करून घेतात म्हणून या दृष्टीने नैतिकमूल्य शिक्षण महत्वाचे आहे.

**३) नैतिकतेतील आदर्शमूल्य :-** सुकरात या शिक्षण शास्त्रज्ञाने गुणाला ज्ञान म्हटले आहे. नैतिकतेला चारित्र्याशी संबंधित केले. हरबर्ट या शास्त्रज्ञाने नैतिक शिक्षणाला शिक्षणाचा उद्देश मानले. त्यांनी असा सिद्धांत मांडला की, ''त्यानुसार साहित्य व इतिहासासारखे विषयाचे अध्ययन करण्याने ज्ञानवृद्धी होते. व्यक्तीमध्ये विचार निर्माण होतात आणि तो चांगले कार्य करू शकतो.'' याला नैतिक विकास असे मानले तसेच या नैतिकतेमध्ये अनेक आदर्श मूल्यांचा समावेश आहे. नैतिकताच मुळी आदर्श आहे. जसे सहनशीलता, त्याग, आत्मसंयम, ब्रह्मचर्य, परोपकार, अहिंसा, दया, समाजसेवा, आसक्ती, कर्तव्यपरायणता, अपरिग्रह प्रेम याशिवाय सदाचाराचे जेवढे गुण आहे तेवढे नैतिकतेचे आहे. एवढेही गुण विद्यार्थ्यांमध्ये येण्यासाठी नैतिक शिक्षणाचा समावेश व त्याचा अभ्यास महत्वाचा आहे.

**४) नैतिकेतेचे व्यापक स्वरूप :-** नैतिकतेमध्ये मानव-मानवाचे संबंध, सामाजिक विषयक, यौन शिक्षण, भ्रष्टाचार, विकासात्मक अवस्था, समस्या, समाजसेवा, योगशिक्षण, या सर्व विषयाचा समावेश होतो. आपण या सर्व विषयाच्या बाबतीत उदासीन बनलो आहे. या विषयाचा अभ्यास करून आपल्या प्रवृत्ती त्यानुरुप बनविणे आणि त्याप्रमाणे आचरण करणे हे नैतिकमूल्य शिक्षणात महत्वाचे आहे. त्यामुळे मानवाचा दृष्टीकोण विशाल बनेल आणि चोरीच्या माध्यमातून जे साहित्य वाचणे आणि त्याचा अनिष्ट प्रकार, परिणाम ओढवून घेणे हे टळेल यासाठी या दृष्टिकोनातून शिक्षण देणे महत्वाचे आहे.

**५) योग्य संस्कार निर्मितीसाठी :-** नैतिक शिक्षणाचा संबंध संस्कार निर्मितीसाठी महत्वाचा आहे. लोकांमध्ये असा विश्वास असतो की आचरणांनी संस्कार बनतात. आणि संस्कारांनी चारित्र्य बनते. संस्कार हे मानवतेची आनुवंशिक देणगी आहे. आणि त्याची पोषकता पर्यावरणातील अभ्यासांनी होते. उदा. समजा आपण एखाद्या तीर्थस्थानावर नेहमी जात असलो तर संत, भक्त किंवा साधूच्या स्वभावाश स्वभाव जुळणाऱ्या व्यक्तीशी संबंध स्थापित होतात. या कारणामुळे मानवी मनात उत्कृष्ट अहं निर्माण

होतो. उत्तेजित होतो. आणि मनुष्यामध्ये धर्म, नैतिकता, आध्यात्मिकता यांचा संस्कार बनतो. आधि संवर्धित होतो. याच संस्कारनिर्मिती सोबतच आपोआपच 'नैतिक चरित्र' व 'धार्मिक-आध्यात्मिक चारित्र्य' याची निर्मिती होण्यास मदत होते. याचाच असाच संबंध सामाजिक चरित्र्य निर्माण होण्याशीही आहे. यावरून असे स्पष्ट होऊ शकते की व्यक्तीच्या नैतिक, धार्मिक, आध्यात्मिक व सामाजिक निर्मितीमध्ये नैतिकमूल्य शिक्षणाचे महत्वपूर्ण योगदान आहे.

**समारोप :-**

नैतिक शिक्षण मनुष्याच्या जीवनात अत्यंत महत्वाचे आहे. नैतिक शिक्षणामुळे मनुष्याचे अंर्तबाह्य जीवन बदलते. चारित्र्य व नागरिकत्वाचे शिक्षण एकत्र दिल्याने त्या व्यक्तीच्या वागणुकीवर त्याचा परिणाम होऊन योग्य-अयोगय, चांगले-वाईट, हक्क-कर्तव्ये याची जाणिव होईल.